# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

**MARATHI**

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVIII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2026 MAY | No. 04


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

नीतिसूत्रे ३१:२३-३१

२३. तिचा नवरा वेशीत देशातल्या वडिलांमध्ये बसलेला असता त्याला लोक ओळखतात.

२४. ती तागाची वस्त्रे तयार करून विकते, आणि कमरबंध व्यापाऱ्याला विकत देते.

२५. सामर्थ्य व मर्यादा तिचे वस्त्र आहेत, आणि ती पुढल्या काळाला हसते.

२६. ती ज्ञानाने आपले मुख उघडते, आणि दयेचा नियम तिच्या जिभेवर असतो.

२७. ती आपल्या घराण्याच्या आचारांस जपते, आणि आळसाचे अन्न खात नाही.

२८. तिची लेकरे उठून तिला आशीर्वादित म्हणतात; तिचा नवराही तिची प्रशंसा करतो, तो म्हणतो,

२९. पुष्कळ कन्यांनी सद्गुणतेने कार्य केले आहे, परंतु तू त्या सर्वांहून उत्कृष्ट झाली आहेस.

३०. सुंदरता कपटी आणि सुरुपता व्यर्थ आहे; जी स्त्री यहोवाचे भय धरते तिची प्रशंसा होईल.

३१. तिच्या हातांचे फळ तिला द्या; आणि वेशीत तिची कृत्ये तिची प्रशंसा करोत.

# तुमची निःशब्द सहनशीलता देवाने अभिवचन दिलेल्या आनंदात बहरेल

**Your Silent Endurance Will Blossom Into God's Promised Joy!**

*- सिस्टर अँजेलिन*



आपल्या तारणाऱ्या आणि प्रभु येशू ख्रिस्ताच्या नावाने **एको ऑफ हिज कॉल** च्या सर्व विस्तारित कुटुंबीयांना हार्दिक शुभेच्छा.

''मातृदिन'' हा केवळ आणखी एक सण नाही; तर तो त्या स्त्रियांना सन्मान देण्याचा आणि ओळख देण्याचा एक विशेष समय आहे, ज्या शांतपणे आपले ओझे वाहतात, तक्रार न करता सहन करतात, आणि अनेकदा इतरांची स्वप्ने पूर्ण व्हावीत म्हणून स्वतः ची स्वप्ने बाजूला ठेवतात.

मी ''आई'' असे म्हणते तेव्हा, मी फक्त जैविक मुलं असलेल्या स्त्रियांविषयीच बोलत नाही, तर मी आध्यात्मिक सर्व आयांचा आणि प्रत्येक अशा स्त्रीचा आदर करते, जी आपल्या मुलांना पोटात वाढवते, त्यांचे पालनपोषण करते, त्यांचे रक्षण करते आणि वेदना होत असतानाही आपला विश्वास कायम ठेवते. मी त्या वडिलांचेही मनापासून गौरव करू इच्छिते, जे अनेक कुटुंबांमध्ये प्रेमाने आईची भूमिका पार पाडतात.

तुम्हा सर्वांना मातृदिनाच्या खूप खूप हार्दिक शुभेच्छा.

(...पान ३ वर)




## एको ऑफ हिज कॉल

**यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !**

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

*पाच मिनिटांचा संदेश*

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

✻ कृपा करून सबक्राईब करा ✻



# ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)

Estd. 1969

## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.
EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

**''......पुनरुत्थान व जीवन मीच आहे......'' -योहान ११:२५**

प्रभुमधील प्रियजनहो,

आपला प्रभु आणि तारणारा येशू ख्रिस्त याच्या अतुलनीय नावात तुम्हा सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

मागील महिन्यात, आमच्या सेवाकार्याद्वारे अनेकजण आशीर्वादित झाले आणि त्यांची पाप, दारिद्र्य आणि आजारपण यातून सुटका झाली. या सेवाकार्यांमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी झालेल्या प्रत्येकाला देव आशीर्वाद देवो. प्रभुने आपल्याला या जगासमोर त्याचा महिमा प्रकट करण्यासाठी निर्माण केले आहे: **''त्या लोकांनी माझी स्तुती वर्णावी म्हणून मी आपणांसाठी त्यांना निर्माण केले.''** (यशया ४३:२१).

जे त्याच्यासाठी परिश्रम करतात त्यांच्यासाठी मोठे प्रतिफळ राखून ठेवण्यात आले आहे. प्रभुने अभिवचन दिले आहे, ......... **''मी तुझ्याबद्दल मनुष्ये व तुझ्या जिवाबद्दल लोक देईन''**. - यशया ४३:४.



*आमच्या मुख्य मंडळीमध्ये आयोजित करण्यात आलेला व्हेकेशन बायबल स्कूल ट्रेनिंग प्रोग्राम.*

या वर्षी एप्रिल-मे दरम्यान होणाऱ्या **व्हेकेशन बायबल स्कुल (VBS)** सेवाकार्यात सहभागी होणाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम १९ मार्च, २०२६ रोजी आमच्या मुख्य मंडळीमध्ये आयोजित करण्यात आला होता. विविध मंडळ्यांमधून सुमारे १५० जणांनी सहभागी होऊन आपली उपस्थिती दर्शवली आणि ते विपुलतेने आशीर्वादित झाले.

अशा प्रकारच्या पूर्वतयारी प्रशिक्षणामुळे, भारतभर विविध मंडळ्यांमध्ये कोणत्याही पंथ भेदाशिवाय मुलांसाठी व्हेकेशन बायबल स्कुल असे कार्यक्रम आयोजित केले जातात. बालसेवाकार्यात गुंतलेल्या मिशन्स, चर्च आणि व्यक्तींसाठी प्रार्थना करणे व त्यांना पाठिंबा देणे हे आपले मुख्य कर्तव्य आहे. **''वचन गाजीव, सुकाळी अकाळी त्यात तत्पर ऐस,..........''** - २ तीमथ्य ४:२.

व्हेकेशन बायबल स्कुल हे एक प्रभावी साधन असल्याचे सिद्ध झाले आहे. भारतातील अनेक शिक्षणतज्ज्ञ, उद्योगपती आणि राजकारणी यांनी आपल्या बालपणी व्हेकेशन बायबल स्कुलला हजेरी लावली आहे. जे लोक व्हेकेशन बायबल स्कुलच्या सेवाकार्यात समर्पण,

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) YouTube Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

प्रेम आणि दूरदृष्टीने सेवा करतात, ते निश्चितपणे आपल्या राष्ट्राच्या आणि जगाच्या भविष्यासाठी एक ईश्वरभक्त पिढी घडवतील. या जबाबदारीत अपयश आल्यास सुवार्तेला विरोध करणारी एक विकृत पिढी उदयास येऊ शकते.

कृपया तुमच्या प्रार्थनांमध्ये आमची आठवण ठेवा, जेणेकरून प्रभुआम्हाला कठीण काळात बळ देईल आणि प्रत्येक अडथळ्यावर विजय मिळवण्यास मदत करील. नियमित लागणारे आर्थिक सहाय्य, समर्पित कार्यकर्ते, अनुकूल राजकीय वातावरण, तसेच देवाचे विशेष अभिषेक व आशीर्वाद यांसारख्या बाबींमध्ये आम्ही प्रभूकडे त्याच्या पुरवठ्यासाठी अपेक्षा ठेवतो.

तुमच्यावर कृपा असो. आमेन!.

येशू ख्रिस्तामधील तुमचा सेवक,

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज,**

E.mail: sam@echoofhiscall.org

(पान १ वरुन...)

## आई समान देव!

पवित्र शास्त्रामध्ये अनेकदा देवाचा उल्लेख पित्यासमान केला जातो. तथापि, वचनामध्ये आईच्या प्रतिमेद्वारे देवाचे कोमल, संगोपन करणारे आणि करुणामय स्वरूपही प्रकट केले जाते.



- **जशी आई त्याच्या मुलाचे सांत्वन करते, तसा देव त्याच्या लोकांचे सांत्वन करतो** (यशया ६६:१३).
- **देवाला आपल्या मुलांचा सांभाळ करणारी आणि प्रेमाने काळजी घेणारी आई म्हणून दर्शवले आहे, जी त्यांचे पालनपोषण करते** (यशया ६६:११).
- **देवाची तुलना आपल्या पिल्लांचे रक्षण करणाऱ्या कणखर आणि धाडसी आईशी केली जाते, ज्यातून त्याचे संरक्षण करणारे प्रेम प्रकट होते** (होशेय १३:८).
- **जरी आई तिच्या पोटच्या मुलाला विसरली, तरी देव उघडपणे हे सांगतो करतो की, तो आपल्या लोकांना कधीही विसरणार नाही** (यशया ४९:१५).
- **जशी कोंबडी आपल्या पिलांना आपल्या पंखाखाली एकवट करते, तशी देव आपल्या लेकरांना एकवट करायला त्यांचे रक्षण करण्याची इच्छा बाळगतो** (मत्तय २३:३७).

हे उतारे आपल्याला आठवण करून देतात की देवाच्या प्रेमात पित्याची ताकद आणि आईची कोमलता दोन्ही समाविष्ट आहेत. आपण देवाच्या काळजीवाहू आणि संगोपन करणाऱ्या गुणांविषयी अजूनही बोलत राहू शकतो, जे त्याच्या लेकरांप्रती असलेले त्याचे खोल आणि करुणामय हृदय प्रकट करतात.

## सारा हसली!

पवित्र शास्त्रातील प्रत्येक आईने असा एक क्षण अनुभवला आहे, जेव्हा देवाने तिच्या आयुष्यातील नेहमीच्या प्रवाहात एका विलक्षण अभिवचनासह हस्तक्षेप केला. सारासाठी तो क्षण तिच्या तंबूच्या प्रवेशद्वारापाशी आला.

पवित्र शास्त्रामध्ये उत्पत्ती १८:१२ मध्ये अशी नोंद आहे: **"आणि सारा हसून मनातल्या मनात म्हणाली, मी जरठ झाल्यावर मला सुख होईल काय? माझा धनीही म्हाताराच आहे."**

देवाने तो क्षण पारखला.

तसेच, जेव्हा देवाने अब्राहामाला मूल होण्याचे वचन दिले, तेव्हा तो सुद्धा हसला होता हे उत्पत्ती १७:१७ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे: **"तेव्हा अब्राहाम उपडा पडला, आणि हसून आपल्या मनात म्हणाला, जो शंभर वर्षांचा त्याला मूल होईल काय? आणि नव्वद वर्षांची सारा प्रसवेल काय?"**

देवाच्या एकाच अभिवचनावर दोघेही हसले, मात्र त्यांच्या हसण्यावर देवाची प्रतिक्रिया वेगळी होती. येथे मला विशेषत:सारा हिच्या हसण्यावर लक्ष केंद्रित करायचे आहे.

सारा हसल्यानंतर, देवाने एक कालातीत प्रश्न विचारला: **"यहोवाला कोणतीही गोष्ट असाध्य आहे काय?......"** – (उत्पत्ती १८:१४).

किती गहन भविष्यसूचक आणि अलंकारिक प्रश्न आहे हा! तो फक्त एक साधारण प्रश्न नाही, तर देवाच्या अमर्याद शक्तीचा आणि सार्वभौम अधिकाराचा एक सामर्थ्यशाली जाहीरनामा आहे.

***येथे आपल्याला लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे:***

- सारा हसली.

## अत्यंत महत्त्वाची सुचना!




नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे तावडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६००००५, भारत**
**Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org**

- मोठ्याने नाही.
- जाहीरपणे नाही.
- पण मनातल्या मनात.

तरीही, देवाने ते ऐकले.

हा संदेश प्रत्येक आईसाठी आहे – मग ती जगिक आई असो, दत्तक आई असो, किंवा आत्मिक आई असो, तसेच ज्या वाट पाहत आहेत, ज्या दुःखी आहेत, किंवा ज्या अजूनही विश्वास ठेवत आहेत, त्या सर्वांसाठी आहे:

- जे बाहेरून हसतात पण आतून ते रडत असतात.
- जे मनातून निराश झालेले असतात.
- ज्यांनी आपलं वय, वेळ किंवा वेदना यांच्यामुळे त्यांची स्वप्ने बाजूला ठेवली आहेत.
- ज्यांना असे वाटते की त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाही, त्यांची कदर केली जात नाही, ते विसरले गेले आहेत, किंवा कदाचित आता ''खूप उशीर'' झाला आहे.

देवाच्या प्रिय मुलांनो, प्रभूची इच्छा आईच्या हृदयातील सुप्त जागांना उघड करण्याची नाही, तर त्यांना बरे करून पूर्ववत करण्याची आहे.

## १. माता आपल्या मनामध्ये मूक हास्य बाळगतात!

पवित्र शास्त्रातील उत्पत्ती १८:१२ मध्ये असे म्हटले आहे, ''..... **सारा हसून मनातल्या मनात म्हणाली.....**''

आई मूक हास्यात पारंगत असतात. आपण आपल्या अंतर्मनातील भावना क्वचितच उघड करतो किंवा इतरांना सांगतो. त्याऐवजी, आपण अनेकदा असे म्हणतो:

- जेव्हा आपण पूर्णपणे थकलेले असतो, तेव्हा ''मी ठीक आहे,'' असे म्हणतो.
- जेव्हा आपल्याला खूप दुःख होत असते, तेव्हा ''काही हरकत नाही'' असे म्हणतो.
- आपण जेव्हा वाटच पाहत असतो, तेव्हा ''मी पुढे निघून गेलो आहे,'' असे म्हणतो.
- आपले मन अजूनही त्या गोष्टीसाठी तळमळत असते, मात्र तरीही आपण म्हणतो, ''आता मला त्याची गरज नाही''.

कदाचित म्हणूनच लोक अनेकदा म्हणतात की स्त्रियांना समजून घेणे कठीण असते. येथे आपण पाहतो की सारा हिचे हसू हे पुढील गोष्टींचे प्रतीक होते:

- निराशा
- विलंब
- वेदना
- आत्म – संरक्षण

अनेक वर्षांपासूनचे दुःख आणि निराशा यातून तिला हसू आले होते. त्या टोमणे मारणाऱ्या नजरा, तीक्ष्ण आणि दोषारोप करणारे शब्द, आणि तिच्या परिस्थितीला ''आध्यात्मिक'' स्वरूप देण्याचे सतत प्रयत्न, तिला शापित म्हणून ठरवताना या सर्वांमुळे हळूहळू वर्षानुवर्षे तिचे हृदय कठोर झाले असावे, आणि त्यामुळे तिला सावध, मौन आणि भावनिकदृष्ट्या दूर ठेवणारे बनवले असावे.

म्हणूनच, शेवटी, एके दिवशी ती आई होईल असे जेव्हा तिने देवाचे अभिवचन ऐकले, तेव्हा तिच्यात आनंद साजरा करण्यासारखे काहीही उरले नव्हते असे मला वाटते.

केवळ आईच नाही, तर आपल्यापैकी अनेक जण अशाच मिश्किल प्रकारे हसतात; देवावर शंका म्हणून नाही, तर आपल्या हृदयाला जोपासण्याकरिता.

तरीही येथे एक सुंदर सत्य आहे: देवाने ते हसू ऐकले.

सारा त्या वेळी तंबूमध्ये होती. तिचे हसू लपलेले होते, मानवी डोळ्यांना न दिसणारे; तरीही देवाने ते पाहिले आणि ऐकले.

आणि जेव्हा देव आपल्या जीवनातील अशा क्षणांना सामोरे जातो, तेव्हा तो आपल्याला लाजवण्यासाठी नाही, तर आपल्यात सुधार आणण्यासाठी करतो.

## २. देव एका आईच्या शंकेला आव्हान देतो!

अब्राहमच्या आणि साराच्या हसण्यात लक्षणीय फरक आहे. अब्राहाम आश्चर्यचकित होऊन हसला व तो त्या बातमीवर आनंदाने भारावून गेला. तथापि, सारा हसली ती दुःख आणि निराशेमुळे.

''सारा तू का हसलीस'' असे देवाने साराला का विचारले?

ती का हसली हे देवाला माहित नव्हते असे तुम्हाला वाटते का? त्याला तिचे दुःख कळले नाही असे तुम्हाला वाटते का?

नवीन करारातही जेव्हा येशू ख्रिस्त एका आंधळ्याला बरे करीत होता, तेव्हा त्याने असाच एक प्रश्न विचारला. मार्क १०:५१ मध्ये तो म्हणतो, **''मी तुझ्यासाठी काय करावे म्हणून तुझी इच्छा आहे?..........''** तो आंधळा त्याला म्हणाला, **''गुरुजी, मला माझी दृष्टी मिळावी.''** याव्यतिरिक्त तो काय मागू शकला असता?

देव आपल्याला असे प्रश्न विचारतो कारण त्याला जाणीव नसते असे नाही, तर साराप्रमाणेच आपल्याही लक्षात येत नाही की अविश्वास केव्हा आणि कसा गुप्तपणे आपल्या हृदयात घर करून बसला आहे.

देवाने ताबडतोब साराला प्रत्युत्तर केले: **''......... सारा हसून का म्हणाली की मी म्हातारी असता मला मूल खरोखर होईल काय?''** – उत्पत्ती १८:१३.

त्याचे हे दटावणे ही तिच्यासाठी शिक्षा नव्हती, तर त्यात संजीवनाचे कार्य होते. कधीकधी, आईचा विश्वास पुन्हा जागृत करण्यासाठी देवाला तिला सामोरे जावे लागते.

प्रिय मित्रांनो, लक्षात ठेवा: देव आपल्याशी सामना करतो कारण,

- त्या मुलासाठी ज्यासाठी आपण अजूनही प्रार्थना करत आहोत.
- ज्या अभिवचनाची आपण अपेक्षा करणे थांबवले होते.
- ती ओळख ज्यावर आपण विश्वास ठेवणे थांबवले आहे.
- ज्या भविष्याचा आपण नकळतपणे त्याग केला आहे.
- जी स्वप्ने आपण गमावली आहेत.

तो एका बंद पडलेल्या गर्भाशयाला पुनरुज्जीवित करीत होता.

तो मृत झालेल्या विश्वासाला पुन्हा जिवंत करीत होता.

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहणे (गलती ६:२), गरजा भागविणे (रोम १२:१३), आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ मे, २०२६ पासून ते १८ जून, २०२६

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

१९ मे - आमच्या मिशन कार्यकर्त्यांनी दाखवलेल्या अद्भुत समर्पणाबद्दल देवाची स्तुती करा.

२० मे - आमच्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबियांवर देवाचे विपुल आशीर्वाद आहेत यासाठी देवाची स्तुती करा.

२१ मे - युद्धामुळे गोंधळ सदृश परिस्थिती आणि भीती यामध्ये देवाने सर्व राष्ट्रांना सुरक्षित ठेवले यासाठी देवाची स्तुती करा.

२२ मे - राजकीय आणि धार्मिक विरोध असूनही आमच्या ख्रिस्ती सेवाकार्याचा विकास आणि चिकाटी यासाठी देवाची स्तुती करा.

२३ मे - समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचे उन्नतीकरण आणि सशक्तीकरण यासाठी देवाची स्तुती करा.

२४ मे - समर्पित कार्यकर्त्यांच्या सहाय्याने आमच्या सुवार्ता प्रिंटिंग प्रेसचे होत असलेले नियमित आणि कार्यक्षम कार्य यासाठी देवाची स्तुती करा.

२५ मे - आमच्या निवासी आणि संध्याकाळी होणाऱ्या **नहेम्या बायबल कॉलेजेस** मध्ये नव्या विद्यार्थ्यांचे होत असलेले प्रवेश यासाठी देवाची स्तुती करा.

२६ मे - आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजेसमध्ये** समर्पित आणि निष्ठावान अध्यापन सदस्यांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

२७ मे - आमची मुख्य मंडळी आणि त्याच्या उप मंडळ्यांमध्ये होणाऱ्या रविवारच्या आशीर्वादित उपासनेसाठी देवाची स्तुती करा.

२८ मे - आमच्या **बायबल कॉरस्पॉन्डन्स कोर्सेस (बायबल कोर)** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डन्स कोर्सेसच्या** होत असलेल्या प्रगतीसाठी देवाची स्तुती करा.

२९ मे - आमचे वरिष्ठ पाळक, एस. सॅम सेल्वा राज, आणि त्यांच्या कुटुंबाना देवाने सर्व संकटांपासून राखले यासाठी देवाची स्तुती करा.

३० मे - आमच्या मुख्य मंडळीच्या आणि उप-मंडळ्यांच्या सर्व सदस्यांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

३१ मे - आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यत्व घेतलेले सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, महान सेवाकार्याचे सहभागीदार, विनंती अर्ज पाठविणारे सहभागीदार, आणि त्या सर्वांच्या कुटुंबियांवर देवाची असलेली दया यासाठी देवाची स्तुती करा.

०१ जून - आमची मुख्य मंडळी आणि तिच्या उप मंडळ्यांद्वारे आयोजित सर्व **व्हेकेशन बायबल स्कुलला** देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

०२ जून - **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलमधील** शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ च्या प्रवेशांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

०३ जून - **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलच्या** इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट निकालाबद्दल देवाची स्तुती करा.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

०४ जून - आमच्या सहकाऱ्यांवर देवाने सातत्यपूर्ण आशीर्वादाचा हात धरावा यासाठी प्रार्थना करा.

०५ जून - आमच्या सेवाकार्याचा शक्यतो सर्व मार्गांनी आणि प्रमाणांनी विस्तार व्हावा यासाठी प्रार्थना करा.

०६ जून - आमच्या सेवाकार्याला प्रार्थना आणि आर्थिक पाठिंब्याद्वारे प्रामाणिकपणे आधार देणारे आमचे समर्थक, शुभचिंतक आणि मित्र यांसाठी प्रार्थना करा.

०७ जून - जगभरातील राष्ट्रपती, पंतप्रधान आणि सर्व सरकारी अधिकारी यांच्यासाठी प्रार्थना करा.

०८ जून - अमेरिकाइस्त्राएलईरान संघर्षामुळे प्रभावित झालेले राष्ट्र, ज्यांनी आपली पायाभूत सुविधांची पुनर्बांधणी करुन लवकरात लवकर भरपायी आणि पुनर्प्राप्ती करावी यासाठी प्रार्थना करा.

०९ जून - जगभरातील **व्हेकेशन बायबल स्कुलमध्ये** सहभागी झालेली मुले त्यांच्या विश्वासात दृढ राहण्यासाठी व विश्वासात त्यांची उन्नती होण्यासाठी प्रार्थना करा.

१० जून - चालू असलेल्या सर्व युद्धांना पूर्णविराम मिळावा आणि संपूर्ण जगभर शांततेचे राज्य प्रस्थापित व्हावे यासाठी प्रार्थना करा.

११ जून - शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये** नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी प्रार्थना करा.

१२ जून - शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी आमच्या निवासी आणि संध्याकाळच्या **नहेम्या बायबल कॉलेजमध्ये** पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी प्रार्थना करा.

१३ जून - आमचे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे उत्तम आरोग्य राहावे यासाठी प्रार्थना करा.

१४ जून - सर्व ख्रिस्ती संस्थांवर देवाचा आशीर्वाद आणि त्याचे संरक्षण असावे यासाठी प्रार्थना करा.

१५ जून - आपल्या विविध सेवाकार्याद्वारे, जिथे सुवार्ता पोहोचलेली नाही अशा ठिकाणी ती पोहोचवण्यास आपल्याला सामर्थ्य मिळावे यासाठी प्रार्थना करा.

१६ जून - पृथ्वीवर देवाचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी देवाने आम्हाला अधिक विस्तृत दर्शन द्यावे यासाठी प्रार्थना करा.

१७ जून - जगभरातील तरुणांनी आणि मुलांनी येशू ख्रिस्ताला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारावे म्हणून प्रार्थना करा.

१८ जून - आमचे वरिष्ठ पाळक एस सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाना उत्तम आरोग्य व संरक्षण लाभावे आणि मंडळीला त्यांचे मार्गदर्शन मिळत राहावे यासाठी प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

## ३. देवाचे वचन कोणत्याही ठिकाणी आईला प्राप्त होते!

मला ही गोष्ट आवडते की, आपण कुठे ही असू देव आपल्याला पाहत असतो. अब्राहम तंबूच्या बाहेर होता, तर सारा आत होती. तरीही देवाने त्याच ठिकाणी संवाद साधला.

त्याचप्रमाणे, येशू ख्रिस्ताने नथनेलाला अंजीराच्या झाडाखाली पाहिले.

देवाने साराला तंबूतून बाहेर येण्यासाठी बोलावले नाही.

ती जिथे होती तिथेच तो तिच्याशी बोलला. आमेन! आपण कुठेही असलो तरी देव आपल्याशी बोलतो.

आपल्यापैकी बहुतेक जण लपून राहतात; ते कामाच्या ओझ्याखाली दबलेले, सतत कोणाची तरी काळजी घेणारे आणि आपल्या जबाबदाऱ्या शांतपणे पार पाडत असतात.

**तरीही देव आईशी बोलतो:**

- किचनमध्ये
- कारमध्ये
- कामाच्या ठिकाणी
- प्रार्थना कक्षांमध्ये
- हॉस्पिटलच्या रूममध्ये
- मध्यरात्री अश्रू ढाळण्यामध्ये
- मूक लढाईमध्ये
- स्वप्नभंगाच्या मध्यावर

देवाच्या प्रिय मुलांनो, आशा सोडू नका. तुम्ही कोठेही असलात तरी तो तुम्हाला पाहतो. तुम्ही तुमच्या कुटुंबापासून, मित्रांपासून किंवा अगदी जगापासून लपू शकता, पण देवापासून तुम्ही लपू शकत नाही. तो आईच्या मायेने आपल्यावर लक्ष ठेवून असतो.

## ४. अभिवचन पूर्ण होण्याआधीच देव आईचे हृदय पुनर्स्थापित करतो!



*साराच्या हृदयात प्रथम विश्वासाची गर्भ धारणा होणे आवश्यक होते.*

साराला इसहाकासाठी गर्भधारणा होण्यापूर्वी, तिच्या हृदयात विश्वासाची गर्भधारणा होणे आवश्यक होते. सारा मानवजातीसाठी देवाचे सर्वात मोठे वचन धारण करणार होती. हे घडण्यापूर्वी, देवाला तिच्यामध्ये एक कार्य करणे आवश्यक होते.

देवाने तिला विचारले, ''देवाला कोणतीही गोष्ट असाध्य आहे काय?''

हा योग्यतेचा प्रश्न नव्हता, तर सामंजस्याचा प्रश्न होता.

**देव म्हणत होता:**

- ***आई, मला तुझं हृदय स्वस्थ झालेले हवे आहे.***
- ***मला तुझी आशा पुनर्जागृत करणे आवश्यक आहे.***
- ***मला तुझा विश्वास जागृत करणे आवश्यक आहे.***
- ***मला तुझा आत्मा पुन्हा जागृत करणे आवश्यक आहे.***
- ***मी अशक्य गोष्टी सुद्धा शक्य करून दाखवतो यावर तू विश्वास ठेवावा हे माझ्यासाठी आवश्यक आहे.***

देवाच्या प्रिय मुलांनो, ज्यांच्याविषयी आपल्यामध्ये विश्वास उरलेला नाही त्याला आपण जन्म देऊ शकत नाही.

वारंवार आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या दुःखांमुळे आशा गमावलेल्या आणि सुन्न झालेल्या आपल्यापैकी काहींशी देव बोलत आहे. मला तुम्हाला याविषयी प्रोत्साहन द्यायचे आहे की, आपण स्वतःला त्याच्या योजनेनुसार जुळवून घ्यावे म्हणून देव त्याची वाट पाहत आहे. जर आपले दर्शन देवाच्या दर्शनाशी जुळत नसेल, तर तो आपल्या जीवनात जे करू इच्छितो ते पूर्ण होऊ शकत नाही.

देव सध्या आपल्यापैकी काहींच्या जीवनात कार्य करत आहे. त्याचे वचन पूर्ण होण्याची वाट पाहत असताना, निराश होण्याऐवजी किंवा देवावर शंका घेण्याऐवजी, आपण स्वतःचे पुनर्मूल्यांकन करूया आणि आपले जीवन त्याच्या इच्छेनुसार जगूया.

## ५. देव एका आईच्या शंकेचे तिच्या ठरवलेल्या नियतीमध्ये रूपांतर करतो!

या महिन्यात मी प्रार्थना करते की, देव तुमच्या शंकांचे रूपांतर तुमच्या ठरवलेल्या नियतीमध्ये करो. साराला एकेकाळी देवाच्या वचनावर शंका होती, पण देवाने नेमलेल्या वेळी सर्व काही बदलून टाकले. मी प्रार्थना करते की, ही तुमचीसुद्धा नेमलेली वेळ ठरावी.

(पान ९ वर)

नहेम्या बायबल कॉलेजेस
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नै
प्रवेशा करिता त्वरा करा !
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
माध्यम : तमिळ (अर्धवेळ)
हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)
ईश्वरविद्या डिप्लोमा & Bachelor of Theology
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५६ वर्षांपासून मान्यता प्राप्त
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. शाखा चर्च : संतोषपुरम, बालाजी नगर आणि वेलाचेरी
७. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
८. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
९. महासभा
१०. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
११. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
१२. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१३. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१४. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१५. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१६. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१७. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१८. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**२१. तमिळ आणि इंग्रजी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२२. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२३. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२४. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२५. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२६. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२७. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२८. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२९. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
३०. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३१. उपवास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३२. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३३. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्रो १० वाजता (फोन द्वारा)
३४. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३५. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल

### टपाल द्वारे धर्म शास्त्राचे अभ्यासक्रम

केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभुत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अशिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टिफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

*अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -*

अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | : **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : **1023 2923 805** |
| **Bank Name** | : **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

**"........... आणि जो यहोवाच्या ठायी भरवसा ठेवतो तो सुखी आहे " – नीतिसूत्रे १६:२०.**

माझ्या सेवाकार्याच्या सुरुवातीच्या वर्षांनंतर, मला परदेशातील ख्रिस्ती धर्मप्रवर्तक कसे जीवन जगतात, ते आपल्या आध्यात्मिक जीवनाचे संगोपन कसे करतात आणि आपले सेवाकार्य कसे पार पाडतात हे समजून घेण्याची गहन इच्छा निर्माण झाली.तथापि, त्या काळी मला आर्थिक साधने, जनसमर्थन, आणि माझ्या स्वत:च्या आध्यात्मिक क्षमतांवरही विश्वास नव्हता.

१९८९ साली माझ्या वहीत माझ्या पुढील योजनांची नोंद करीत असताना, मी ऑगस्ट महिन्यात मलेशियाला भेट देईन असे लिहिल्याचे माझ्या लक्षात आले, आणि हे माझ्यासाठी आश्चर्याचे ठरले. त्यानंतर लगेचच जवळपास तीन महिन्यांसाठी मी त्याबद्दल पूर्णपणे विसरून गेलो. एक दिवस, जेव्हा मी पुन्हा माझी वही पाहत होतो, तेव्हा माझ्या लक्षात आले की, मी जी तारीख लिहिली होती ती लवकरच येऊन ठेपली आहे. माझे मन थोडे गोंधळलेले होते आणि मला काय करावे कळत नव्हते, त्यामुळे मी हा प्रश्न प्रार्थनेत प्रभूकडे सोपविला.

''**कशाचीही चिंता करू नका; तर सर्व गोष्टींविषयी उपकार स्तुतीसहित प्रार्थना व विनंती करून आपली मागणी देवाला कळवा**''. - फिलिप्पै ४:६.

दिवस निघून गेले, तरी काहीही घडले नाही. मला पूर्णपणे कळत होते की परदेशात जाऊन सेवा करण्याची माझ्यात पात्रता नाही. तरीही, मी देवावरचा माझा विश्वास हरवला नाही.

त्या काळात, मला एका भावाला भेटण्याची मला संधी मिळाली, जो मलेशिया सारख्या देशांमध्ये देवाच्या वचनांचा प्रचार करण्यासाठी वारंवार प्रवास करायचा. मला परदेशात जाण्याची माझी इच्छा त्याला सांगितली. त्यांनी मला पुढील मार्गदर्शनासाठी चेन्नईतील त्यांच्या घरी येण्याचा सल्ला दिला. त्यानुसार, एके दिवशी पहाटे मी त्यांना भेटायला लांबचा प्रवास करून गेलो. मात्र, तो व्यस्त असल्याचे सांगून त्याने मला दुसऱ्या दिवशी परत यायला सांगितले. मी पुन्हा गेलो तेव्हा त्याने मला दुसऱ्या दिवशी यायला सांगितले. हे जवळजवळ महिनाभर चालले, ज्यामुळे माझा बराच वेळ आणि पैसा वाया गेला. अखेरीस, माझ्या लक्षात आले की त्याला मला मदत करण्याची इच्छा नव्हती.

नंतर तो मला स्पष्टपणे म्हणाला, ''तू मलेशियाला जाऊ शकत नाहीस. तिथे फक्त माझ्यासारखे प्रतिभावान आणि सक्षम लोकच जाऊ शकतात. मलेशियामध्ये तुम्हाला कोणीही स्वीकारणार नाही. पुन्हा माझ्याकडे येऊ नका''.

या निराशेनंतरही मी आशा सोडली नाही. मी प्रार्थना करत राहिलो आणि देवाची इच्छा पूर्ण होण्याची धीराने वाट पाहिली.

दोन आठवड्यांनंतर, मी माझ्या कार्यालयातील मला आलेली पत्रे तपासत असताना, मला मलेशियाहून आलेले एक पत्र सापडले. ते तिथे सेवाकार्य करीत असलेले दिवंगत पास्टर देवराजुलू यांचे होते. त्यांच्या पत्रात असे लिहिले होते:

**ख्रिस्तामधील माझे प्रिय बंधू, ब्रदर सॅम सेल्वा राज,**

***मला पुस्तकांची आवड आहे आणि आज मी जुनी पुस्तके विकणाऱ्या एका दुकानात गेलो होतो. तिथे काहीतरी उपयुक्त वस्तू शोधत असताना, मला तुमच्या 'इको ऑफ हिज कॉल' या मासिकाची एक फाटलेली प्रत सापडली. जेव्हा मी ती वाचायला सुरुवात केली, तेव्हा मला जाणवले की प्रभु माझ्याशी थेट बोलत आहे.***

***कृपया तुमचे पूर्वीचे अंकही मला पाठवा; टपालाचा खर्च मी देईन व मला तुम्हाला प्रत्यक्ष भेटायलाही आवडेल. मी मलेशियामधील तुमच्या प्रवासाचा, जेवणाचा आणि राहण्याचा खर्च उचलण्यास तयार आहे.***

***शिवाय, मी तुमच्या सिंगापूर आणि इंडोनेशियामधील सेवेची व्यवस्था करीन. आम्हाला तुमच्यासारख्या देवाच्या सेवकांची गरज आहे. कृपया लवकरात लवकर उत्तर द्या.***

***प्रेमपूर्वक आमंत्रण,***
***पास्टर देवराजुलू.***

मी माझ्या वहीत लिहिल्याप्रमाणे, दिवंगत पास्टर देवराजुलू यांच्या निमंत्रणावरून मला ऑगस्ट १९८९ मध्ये मलेशियाला भेट देता आली. तेथून मी सिंगापूर आणि इंडोनेशियालाही प्रवास केला, जिथे मी शेकडो लोकांना पाप, शाप, गरिबी आणि प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे मिळणाऱ्या तारणाविषयी उपदेश केला. प्रभुच्या कृपेने मला त्या देशांमधील अनेक धर्मोपदेशकांशी चिरस्थायी मैत्री निर्माण करता आली, जी मैत्री आजही टिकून आहे.

प्रभुच्या विपुल कृपेने, माझ्यासाठी दक्षिण आफ्रिका, युनायटेड स्टेट्स, इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका यांसारख्या देशांना भेट देण्याचे मार्ग खुले केले. मला हजारो लोकांना येशू ख्रिस्ताविषयी उपदेश करण्याचा बहुमान मिळाला आहे.

आज मला अनेक देशांकडून आमंत्रणे येतात, जी वेळेच्या मर्यादेमुळे स्वीकारणे मला शक्य होत नाही. देवाने मला इतका आशीर्वाद दिला आहे.

प्रिय वाचकांनो, ज्या प्रभु येशू ख्रिस्ताची मी घोषणा करतो, तोच खरा देव आहे. तोच मार्ग, सत्य आणि जीवन आहे. त्याच्यावर विश्वास ठेवा. त्याच्याकडे या. स्वतःला त्याच्या सेवेसाठी समर्पित करा. तो तुम्हाला अद्भुत मार्गांनी मार्गदर्शन करील आणि तुमच्या जीवनाला भरभरून आशीर्वाद देईल.

**''त्याने खडक पालटून पाण्याचे तळे केले, गारेचा खडक पालटून पाण्याचा झरा केला''**. - स्तोत्र ११४:८.

(पान ६ वरून...)

उत्पत्ती २१:६ - '' **आणि सारा म्हणाली, देवाने मला हसवले; जो कोणी ऐकेल तो माझ्याबरोबर हसेल''**.

✓ एकेकाळी ज्या स्त्रीच्या मनात शंका होती, आता तीच स्त्री आपल्या सुखद नियतीसाठी हसत आहे.

✓ ज्या तोंडाने अविश्वासाचे शब्द कुजबुजले होते, तेच तोंड आता साक्ष देत आहे.

✓ जे गर्भाशय वांझ होते, तेच आता आशेचा किरण घेऊन एका निर्मितीसाठी सज्ज आहे.

**देवाने बदलले:**

- तिचे दुःख आनंदात बदलले.
- तिची शंका विश्वासात बदलली.



- तिचे मौन उत्सवात बदलले.
- तिचे लपलेले हास्य एका सार्वजनिक साक्षीत परिवर्तित केले.

देव तुमच्यासाठी आणि माझ्यासाठी हेच करतो.

जेव्हा खाली दिलेल्या सर्व आईंच्या जीवनात देवाने हस्तक्षेप केला, तेव्हा एक विलक्षण गोष्ट घडली:

मित्रांनो, तुम्हाला कदाचित असे

| | |
|---|---|
| **Mary, the mother of Jesus Christ** | **the promise of a Saviour** |
| **The mother of Samson** | **the promise of a deliverer** |
| **Elizabeth, the mother of John** | **the promise of a reformer** |
| **Sarah, the mother of Isaac** | **the promise of a new legacy** |

वाटले असेल की, देवाने त्यांच्या जीवनात हस्तक्षेप करून गोंधळ आणि अनागोंदी निर्माण केली. मात्र योग्य वेळी, देवाने नेमलेल्या वेळी त्याने आपले वचन पूर्ण केले.

धीर सोडू नका. जर तो त्यांच्यासाठी हे करू शकला, तर तो तुमच्यासाठीही करू शकतो.

देव तुम्हाला तुम्ही जिथे आहात तिथेच पाहतो आणि ऐकतो. तुम्ही या जगाच्या नजरेपासून लपलेले असाल, पण तुम्ही देवाच्या नजरेपासून कधीही लपलेले नसता.

देव तुमचे प्रदर्शन मांडायला नाही, तर तुम्हाला सामर्थ्यवान बनवण्यासाठी तुमच्या अंतर्मनाचा सामना करीत आहे. त्याने साराला जो प्रश्न विचारला होता, तोच तो तुम्हालाही विचारत आहे:

यहोवाला कोणतीही गोष्ट असाध्य आहे काय?

आज, आपला विश्वास पुन्हा वाढू द्या.

******


# नहेम्या बायबल कॉलेज

एको ऑफ हिज कॉल संस्था

(निवासी – हिंदी आणि संध्याकाळ –तमिळ)

२६ वा पदवीदान समारंभ

४ जुलै २०२६, शनिवार, सायं. ५:०० वाजता



विशेष अतिथी :

रेव्ह. डॉ. एस. जे. किंग्सले

(सीओओ, जीसस कॉल्स)

**at Skidmore Hall,**
**Balar Kalvi Nilayam Hall, M.R.C. Centre,**
**5/6, Ritherdon Road,**
**Vepery, Chennai - 600 007.**

❋ शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ साठी प्रवेश सुरू झाले आहेत!
❋ कृपया पात्र विद्यार्थ्यांची शिफारस करा!!
❋ निवासी पुरुष हिंदी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती उपलब्ध आहे!!!
❋ शैक्षणिक वर्ष २०२६–२७ चे वर्ग ०१.०६.२०२६ रोजी सुरू होतील!!!!

प्रार्थना करा आणि सहभागी व्हा!

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## OUR BANK DETAILS:

### 1. Bank : State Bank of India

| | |
|---|---|
| Branch | : Triplicane, Chennai-5 |
| Name | : S. Sam Selva Raj |
| A/C No. | : 1023 2934 679 |
| IFSC | : SBIN 00 00 249 |

SWIFT CODE : SBI NIN BB 455

### 2. Bank : ICICI Bank

| | |
|---|---|
| Branch | : Anna Salai, Chennai-6 |
| Name | : Echo of His Call |
| A/C No. | : 6038 0502 2319 |
| IFSC | : ICIC 000 6038 |

### 3. Bank : State Bank of India

(This Account is for Tax Exemption for Indians only )

| | |
|---|---|
| Branch | : Triplicane, Chennai-5 |
| Name | : Echo of His Call Educational Trust |
| A/C No. | : 1023 2923 805 |
| IFSC | : SBIN 00 00 249 |

## OUR QR CODE:

ECHO OF HIS CALL

Scan to pay with any UPI app

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
E.mail : sam@echoofhiscall.org

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य, गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-    आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणाऱ्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS Patrika Channel"
on 12th MAY 2026.
If un-delivered please return to:
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**